# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/३३६/२०११ — दि. २२ मार्च २०११

<u>वृत्त प्रसिध्दीसाठी</u>

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे पारंपारिक विद्यापीठांच्या आरोग्य विद्याशाखांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी वर्ग

**नाशिक (दि.२२) :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे पारंपारिक विद्यापीठांच्या विविध आरोग्य विद्याशाखांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी वर्ग करण्यात आले असून त्यावरील पुढील प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

पारंपारिक विद्यापीठांच्या विविध आरोग्य विद्याशाखांतील अभ्यासक्रमांना प्रवेशित सन १९९८ पूर्वीचे पदवी अभ्यासक्रमांचे विद्यार्थी आणि सन २००६ पूर्वीचे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी याबाबतचा अध्यादेश क्रं. XIIV of 2010 नुकताच काढला असून याबाबत विद्यापीठातर्फे अधिसूचना क्रं. ०८/२०११ प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर वर्ग होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नियम, अटी, कायदा, अध्यादेश लागू होणार आहे. या अनुषंगाने प्रवेश पात्रता (आरक्षण) विषयक निर्णय हे शासन धोरण, अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती लागू असणार आहे. विविध आरोग्य विद्याशाखांशी संबंधित केंद्रीय परिषदा आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संबंधीत नियम, अटी, कायदा, अध्यादेश, पात्रता, अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती इत्यादींचा विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र भरल्यानंतरच सदर विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नियमित विद्यार्थी म्हणून मान्यता मिळणार आहे. विद्यापीठातर्फे प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेनंतर विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र विद्यार्थ्यांना सहा महिन्यांच्या आत सादर करावयाचे आहे. त्यानंतर सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन त्यांचे निकाल महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे घोषित केले जाऊन त्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

**कुलसचिव**